दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.२ जानेवारी २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक १२९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 2 January 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 129 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### पुण्यात भाजप उमेदवाराचा अर्ज मागे

**मुंबई**–भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार पूजा मोरे-जाधव यांनी गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. पक्षाच्या कार्यकर्त्यांचा रोष आणि सोशल मीडियावर सुरू असलेल्या खालच्या पातळीवरील राजकारणामुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले. पुणे शहरात भाजपने त्यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर हा वाद निर्माण झाला होता.उमेदवारी जाहीर झाल्यानंतर भाजप कार्यकर्त्यांसह इतर पक्षांच्या कार्यकर्त्यांनीही सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात त्यांच्यावर टीकास्त्र सोडले होते. या टीकेमुळे व्यथित होऊन मोरे-जाधव यांनी उमेदवारी अर्ज मागे घेताना आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.यावेळी पूजा मोरे-जाधव म्हणाल्या, माझ्या खूप वेदना आहेत. माझा प्रवास सर्वसामान्य घरातून झाला आहे. पती धनंजय जाधव यांच्याशी विवाह करून पुण्यासारख्या मोठ्या शहरात येईल असे कधी वाटले नव्हते. त्यांनी पोलिसांच्या लाठीकाठीखाली विविध आंदोलने करत पाच गुन्हे अंगावर घेतल्याचे आणि तारुण्यात अनेकदा न्यायालयात फेऱ्या मारल्याचे सांगितले.

# नाशिक,संभाजीनगरमधील घटनांची पक्षाकडून नोंद


## नाराज कार्यकर्त्यांची समजूत काढू– चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई (प्रतिनिधी)–महानगरपालिका निवडणुकीच्या अर्ज भरण्याच्या प्रक्रियेत भाजपमध्ये उडालेल्या गोंधळावर प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज भूमिका स्पष्ट केली. जागा कमी आणि इच्छुकांची संख्या जास्त असल्यामुळे काही ठिकाणी नाराजी पसरली आहे, हे सत्य आहे. मात्र, ५१ टक्के मतांची लढाई जिंकण्यासाठी आम्हाला काही ठिकाणी पक्षप्रवेशाचे प्रयोग करावे लागले, असे बावनकुळे यांनी सांगितले. नाशिक आणि संभाजीनगरमधील घटनांची पक्षाने गांभीर्याने दखल घेतल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, जागा कमी आणि इच्छुक कार्यकर्त्यांची संख्या जास्त त्यामुळे काही ठिकाणी वातावरण खराब झाले होते. नाशिकमध्ये १२२ जागा आहेत, तर अर्ज ७०० आलेत. त्यामुळे कार्यकर्त्यांची थोडी नाराजी झाली आहे. संभाजीनगरला मी स्वत: होतो. त्याठिकाणी ५६१ अर्ज आलेत. आपण एकाला उमेदवारी देऊ शकतो, पण त्याठिकाणी २० लोकांनी मागणी केली. त्यामुळे काही कार्यकर्त्यांची नाराजी आहे. पण कार्यकर्ते पक्षाची भूमिका समजून घेतील. पक्षादेश समजून घेतील आणि खराब झालेले वातावरण आम्ही शांत करू.



### निष्ठावंत विरुद्ध 'आयाराम': बावनकुळेंचे स्पष्टीकरण

बाहेरून आलेल्यांना लगेच उमेदवारी दिली जाते, असा आरोप भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे. यावरही चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले, काही ठिकाणी आम्ही कधीच जिंकू शकत नाही. काही ठिकाणी कधीच जिंकलो नाही. नाशिकमध्ये १८-२० वॉर्ड असे आहेत, जिथे भाजप कधीच जिंकली नाही. त्यामुळे ५१ टक्क्यांची लढाई जिंकण्यासाठी आम्हाला पक्षप्रवेश करावे लागले. शेवटी जो जीता वो सिंकदर. जिथे भाजपचा ओरिजिनल कार्यकर्ता जिंकू शकतो, तिथे कुठेही पक्षप्रवेशाचे प्रयोग केले नाहीत किंवा तसा प्रयोग झाला नाही. जिथे कमी आहोत, तिथे डिशन केलेत, त्यामुळे नवीन उमेदवाराला जागा देण्यात आल्या आहेत, असे बावनकुळे म्हणालेत.



### कार्यकर्त्यांना एकसंघ लढण्याच्या सूचना

नाशिक आणि संभाजीनगर मधील घटना नोंद घेण्यासारख्या आहेत. पक्षाने या घटनांची नोंद घेतलेली आहे. चंद्रपूरमध्येही अशीच परिस्थिती झाली होती. पक्षाने तिथेही नोंद घेतलेली आहे. त्यामुळे जे काही झालंय, त्यातून बाहेर निघून आपल्याला एकसंघपणे लढून महानगरपालिकेत यश मिळवायचे आहे, अशा आमच्या कार्यकर्त्यांना सूचना आहेत. निवडणुकीची तिकिट वाटप करतात, जे काही कमी जास्त झाले, ते आपण दुरुस्त करू, असे आश्वासन चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

### ५१ टक्के नगरसेवक निवडून येतील

मतदानाआधीच भाजपचे चार नगरसेवक निवडून आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वा आम्हाला यश मिळाले आहे. ही आता सुरुवात झालेली आहे. महाराष्ट्रातील जनतेचे आम्हाला समर्थन मिळत आहे. डबल इंजिन सरकारच आमच्या शहराचा विकास करू शकते, असा विश्वास जनतेचा भाजप महायुतीवर आहे. जनता आता टोमण्यांवर विश्वास ठेवत नाही, तर विकासावर विश्वास ठेवते. त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्रात दोन तृतीयांश बहुमताने आणि ५१ टक्क्यांच्यावर नगरसेवक निवडून येतील, असा विश्वास चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

# बालविवाहाविरोधात ग्रामपंचायत तेलखेडीचा कडक इशारा



दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

धडगाव तालुक्यातील ग्रामपंचायत तेलखेडी येथे ग्रामपंचायतीच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना अंतर्गत बालविवाह रोखण्यासाठी प्रत्येक पाड्यावर जाऊन बालविवाह विरोधात जागृती करण्यात येत आहे.

हा महत्वकांक्षी उपक्रम धडगाव सारख्या ग्रामीण ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येत असल्यामुळे नागरिकांनी या या उपक्रमाचे स्वागत केले आहे. बालविवाह ही सामाजिक कुरूप प्रथा असून ती कायद्याने गंभीर गुन्हा असल्याचे सांगत ग्रामपंचायतच्या वतीने ग्रामस्थांना जाहीर आवाहन करण्यात आले आहे. बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार विवाहासाठी मुलीचे किमान वय १८ वर्षे व मुलाचे किमान वय २१ वर्षे पूर्ण असणे अनिवार्य आहे, याची माहिती ग्रामपंचायतीकडून देण्यात आली.

या कायद्याचे उल्लंघन केल्यास केवळ बालविवाह करणाऱ्यालाच नव्हे तर तो लावून देणारे भटजी/पंडित, संबंधित पालक तसेच विवाहात सहभागी होणाऱ्या वराडी मंडळींनाही कठोर शिक्षा होऊ शकते. कायद्यानुसार दोषी आढळल्यास २ वर्षांची सक्तमजुरी व १ लाख रुपये दंड अशी शिक्षा होण्याची तरतूद आहे, असेही स्पष्ट करण्यात आले.ग्रामपंचायत तेलखेडी ने सर्व नागरिकांना सुज्ञ राहण्याचे व बालविवाह टाळण्याचे आवाहन केले आहे. गावात कुठेही बालविवाह होत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ संबंधित यंत्रणेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी चाईल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा पोलीस १०० या क्रमांकांवर माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ही जनजागृती मोहीम सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य आंधळी यांच्या सौजन्याने राबविण्यात येत असून, बालविवाहमुक्त गाव घडवण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे, असे ग्रामपंचायतीने म्हटले आहे.

# धानोरा रोडची निर्मिती ५० फूट रुंदीकरणासह करण्यात यावी-बीड शहर बचाव मंच व सर्वपक्षीय मागणी

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

धानोरा रोडच्या सुरू झालेल्या कामाच्या संदर्भात आज बीड शहर बचाव मंच व सर्वपक्षीय प्रतिनिधींनी नगर परिषद मुख्याधिकारी यांच्या कार्यालयामध्ये महत्त्वाची बैठक घेतली.

या बैठकीमध्ये सर्वांच्या वतीने निवेदन करण्यात आले की धानोरा रोडचे नवनिर्माण वाढत चाललेल्या विस्तारानुसार व रहदारीच्या गरजेनुसार पुरेशा रुंदीकरणासह करण्यात यावे. नगर परिषदेचे मुख्य अधिकारी निलेश फडसे यांनी बीड नगर परिषदेचा कार्यभार हातात घेतल्यानंतर तात्काळच बऱ्याच वर्षांपासून व खूपच काळ प्रलंबित राहिलेल्या धानोरा रोड साठी प्राधान्यक्रम देऊन नव निर्मिती साठी व त्यासंदर्भातील मंजुरींसाठी सहकार्य केलेले आहे. तरी वस्तुस्थिती अन्वये धानोरा रोड हा बीड शहराला नूतन मुख्य रेल्वे स्थानकाला तसेच अनेकानेक गाव खेड्यांना जोडणारा मुख्य रस्ता आहे. याच रस्त्यावर नऊ ते दहा शाळा-विद्यालये आहेत. तसेच शहराच्या वाढत्या विस्ताराबरोबरच वाढत्या लोकसंख्येप्रमाणे धानोरा रोड वरून मोठे



दळणवळण दररोज होत असते. धानोरा रोड वरून होणाऱ्या दैनंदिन रहदारीच्या गरजेनुसार या रस्त्याचे नवनिर्माण भक्कम पद्धतीचे, दर्जेदार व पुरेशा रुंदीकरणासह होणे गरजेचे आहे. तरी स्थानिक जनतेच्या व रहदारीच्या गरजेनुसार या रस्त्याचे निर्माण कमीत कमी ५० फूट रुंदीकरणासह करण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे. सद्यपरिस्थितीमध्ये उपलब्ध करून दिलेल्या निधीमध्ये पन्नास फूट रुंदीकरणासह रस्त्याचे निर्माण करण्यात यावे. अशा प्रकारे केलेले रस्त्याचे निर्माण हे प्रदीर्घकाळ उपयोगी ठरणारे तसेच वाढत्या विस्ताराच्या दृष्टीने सोयीचे ठरणार आहे. अशी मागणी स्थानिक जनता व बीड शहर बचाव मंचाच्या वतीने करण्यात येत आहे. याच अनुषंगाने स्थानिक जनता व बीड शहर बचाव मंच, केलेली मागणी पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशारा देत आहे. या बैठकीमध्ये प्रामुख्याने बीड शहर बचाव मंचाचे मार्गदर्शक प्रा.कॉ. डी.जी तांदळे, अध्यक्ष नितीन जायभाये, संपादक-पत्रकार साहस आदोडे, मातृभूमी प्रतिष्ठानचे डॉ. संजय तांदळे, शिवसेना जि. संघटक रतन गुजर, एस.डी.पी.आय. पार्टीचे काझी तखियोद्दिन, कलीमभाई फारोकी, दिशान फारोकी, समीर काजी, रा.कॉ. श.प.गटाचे अमोल पारवे,रा.कॉ. श.प.गटाचे आम्रपाली साबळे, निवृत्त पो.नि. गोरख दिवे, पत्रकार नितेश उपाध्याय आधी सर्वजण बहुसंख्येने उपस्थित होते.

## वादळी कट्टा

### मी त्यांचा नाही

भावनेचा बाजार ज्यांनी मांडला,
तो दलाल माझा नाही..

विजयाचा जो उन्माद माजला,
तो गुलाल माझा नाही..

उचलली उसण्या वेदनेची गाठोडी ज्याने,
तो हमाल माझा नाही..

राहिलो ज्या गर्दीत उभा मी,
तो तमाशा माझा नाही..

चालतो काजव्याच्या प्रकाशात मी,
तो सूर्य माझा नाही.

:: कवी ::
विलास पोवळे



# मोजणी पूर्ण करूनच शिवरस्ते करावेत, शेतकऱ्या कडे शेकडो एक्कर जमिनी नाहीत : डॉ.कदम अजय

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**


) शेती हा भारतीय जीवनाचा कणा असून, शेतकरी हा देशाचा बाप आहे. असे आपण ऐकत आलो आहोत. गेल्या काही दशकांपर्यंत हे खरेही होते. आज परिस्थिती बदलेली आहे. सरकारने काढलेला शेतकरी हिताचा निर्णय प्रत्यक्ष मात्र शेतकर्याच्या नरडीचा घोट घेणारा ठरत आहे. महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांनी मागेल त्याला रस्ता. ही योजना सुरु केली आहे. सात दिवसांत रस्ता. सर्वे नंबर बारा फुटांचा तर शिव रस्ता ३३ फुटांचा. यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत. राज्यात गेल्या १०० वर्षांत शेतीची मोजणी झाली नाही. शेतकरी बांध फोडत नाही तरीही काही वर्षांमध्ये हे बांध पाच-दहा फुट इकडे तिकडे सरकले नाहीत असे कोण म्हणू शकेल? अशावेळी जमीन मोजणी न करता रस्ते केले जात असतील तर कोण्यातरी एका शेतकर्याचे फार मोठे नुकसान होते. वाढती लोकसंख्या, बेरोजगारी आणि तेवढीच जमीन असल्यामुळे शेतीचे तुकडे पडत आहेत. अशावेळी जर शेतकर्यांच्या बांधावरूनच हे रस्ते होणे गरजेचे आहे. रस्ता झाल्यामुळे त्याला फायदा होणार आहे. दळणवळण नीट होणार आहे. शेतीसाठी लागणारी यंत्रे तो सहजपणाने घेऊन जाऊ शकणार आहे. हे सर्व त्याला समजते मात्र सातबारावर जमीन आहे आणि प्रत्यक्ष आपली जमीन रस्त्यात गेली आहे हे भविष्यात त्याला समजल्यावर त्याच्या मनाची काय अवस्था होईल?. एक फूट बांधासाठी हा शेतकरी सुप्रीम कोर्टापर्यंत आपली बाजू मांडत असतो. हे फक्त शेतीवरचे त्यांचे प्रेमच नसते तर त्याच्या स्वभिमानाचा प्रश्न असतो. मला कुणाची एक इंच जमीन नको मात्र जीव गेला तरी माझी एक इंच जमीन मी दुसर्याला घेवू देणार नाही. अशी त्याची प्रांजळ भावना असते. गेल्या चार-पाच पिढ्यांपासून शेती करणारे कितेक शेतकरी कधीही भूमिअभिलेख कार्यालयात गेले नाहीत. आपल्या जमिनीची खरी कुंडली त्यांनी पहिलीच नाही. यापेक्षा



भयंकर म्हणजे तलाठी कार्यालयात जाऊन आपली सातबारा वर्षानुवर्षे न घेतलेले शेतकरीही या राज्यात आहेत. एवढ्या गुण्यागोविंदाने नांदणाऱ्या शेतकर्याच्या शेतीकडे केतेकांच्या काकनजरा टक लावून बसलेल्या असतात. त्यातच भर म्हणजे या मागेल त्याला रस्ता या योजनेने पडली आहे, असे खेदाने म्हणावे लागत आहे. सरकारदरबारी जावून शेतकरी रस्ता मागत नाही आणि असा कोण शेतकरी आहे ज्याचा रस्ता लगेच मंजूर होतो. मात्र, असे रस्ते होत असतील तर तो त्याचे स्वागत करतो. त्याची मागणी फ़क़्त एकच असते की, माझ्या लेकरांच्या भाकरीवर या तुमच्या रस्त्याचा नकाशा काढू नका. तुम्ही जमीन मोजणी करा. दोन्ही सर्वे नंबरच्या मध्यातून हा रस्ता काढा. अशा आशयाचे निवेदन केज तालुक्यातील कदमवाडी या गावातील नागरिकांनी तहसिलदार साहेबाकडे दिले आहे. या वेळी कदम सुमित्राबाई सखाराम, कदम परमेश्वर,कदम विजय, कदम कैलास ,कदम मंगेश. कदम वैजिनाथ, मुळे भागवत, शिंदे पद्माकर , कदम राजाराम, कदम अमर सतीश , कदम नरहरी तुकाराम, कदम श्रीराम आत्माराम हे सर्व शेतकरी उपस्थित होते.

# संपादकीय

## इच्छापूर्ती



भले बुरे ते घडून गेले, विसरुन जाऊ सारे क्षणभर, जरा विसावू या वळणावर... या वळणावर... कॅलेंडरवरची पान वायूवेगाने पळतात, नव्हे त्यांना पळवणारा कुणी दुसराचं असतो. हा दुसरा म्हणजे कुणी माणूस नसून एकमेव काळ असतो, जो वाऱ्याला धजत नाही, पाण्याला थिजत नाही. त्याच्या एका इशाऱ्याने आपात घडतात. काळाची गणित वेगळी असल्याने त्याला कुठलचं मोजमाप नसल्याने वेगाचा अंदाज बांधणं कठीण होतं. आजच्या दिवसाचं काम उद्या पाहू म्हणणाऱ्याला चित करण्याची किमया कळत असते. आपण त्याला ना हरवू शकत ना कूरघोडी करू शकत. दिवस रात्रीच्या फेऱ्यात आहिस्ता आहिस्ता पावलं टाकत काळ पुढं सरकतो. त्याच्यापुढे आपण कितीही सुज्ञ असल्याचा भाव आणला तरी उपयोग नसतो. घडून गेलेल्या गोष्टीकडे फक्त पाहात राहणं, एवढं आपल्या हाती उरतं. तेल गेलं तूप गेलं अन् हाती राहिलं धुपाटणं याची वानगीदाखल प्रचिती देताना वाईट गोष्टी तो दाखवतो, कधी घडवून आणतो. कधी तो उंचीवर नेतो तर कधी दुःखाच्या खाईत लोटतो. त्याच्यापुढे कुणाचेचं चालत नाही. आज, आता, उद्या, परवा म्हणता म्हणता दिवसाचे चोवीस तास उलटतात. एक दिवस एक महिना एक वर्ष क्षणाक्षणाला निसटून जातं. दिवस रात्रीच्या बंद कुलूपात आपण स्वतःला सुरक्षित समजत असलो तरी, काळ कधी घाला घालेल, उलटवार करेल याचा नेम नसतो. सूर्य उगवताना मावळतीच्या धरेला सोबत घेऊन येतो. सूर्याचे उगवणे, मावळणे चंद्राच्या कला यावर काळाचा अंकुश असल्याने पृथ्वीवर प्रचंड उलाढाली होतात. काळाचं एक बरं असतं. कुणाच्या अध्यात मध्यात न पडता स्वत:चं काम चोख बजावत चांगल्या वाईट कर्माची फळं चाखायला देतो. असं म्हणतात की, सब्र का फल मिठा होता हैं! पूर्वी हे सब्र वगैरे मानण्यातला माझा स्वभाव नव्हता. झटपट पटापट यावर मी स्वतःला समृद्ध समजत होते. पण वेळ काळाच्या काठीचा आवाज दाखवते या मताशी मी पोहोचलेय. कारण एकचं. इच्छा नावाची अनमोल गोष्ट आयुष्यात आली आणि पूर्तीच्या दृष्टीने पावलं भरभर चालू लागली. प्रथम काळाबरोबर चालणं मुश्किल वाटत होतं पण श्रम, सातत्य, प्रयत्नाची मोट बांधली आणि दारात स्वप्नपूर्तीची लक्ष्मी हासत आली. या वर्षाने पदरातल्या गोष्टींचं सोनं केलं. मनातल्या तीव्र इच्छेवर साहसाचं खोगिर चढवलं. इच्छेला कृतीची जोड मिळाली. इच्छेतून प्रोत्साहन मिळालं. वेळेला ध्येयपूर्ती प्रवाहात इच्छा मारून गरजा कमी केल्या. प्रगतीची वाट धरली. अंतर्मनातली अमर्याद शक्ती ओळखली. माणूस म्हणून जगण्याचं सामर्थ्य वाढवलं. वर्षारंभी आखलेलं इच्छा प्रयोजन वर्षाअखेरीस पूर्णत्वास आलं. यशस्वी होण्यासाठी आत्मिक नव्हे तर बौद्धिक, शारीरिक, मानसिक, सामाजिक सर्व स्वाभाविक इच्छेवर काम केल. इच्छापूर्तीचं हे वर्ष सुख आणि समाधान देऊन गेलं. प्राप्त इच्छा घेऊन निघालेले मी जुनं सोडून जाताना परिघाच्या पल्याड कडेलोट होतो भावनांचा. घड्याळाच्या काट्यावर उभं राहून तुझ्याबरोबर अगणित नाती-गोती जोडली. सुखदुखाच्या भावना मांडल्या. कधी रडले, कधी हसले. कधी पडता पडता सावरले, कधी सावरताना आपटले, गुंतता हृदय भावनिक झाले. हे प्रभाकरा पाणी आटल्या नयनामध्ये कसे जमावे मोती, दूर किनारी वाहत गेल्या आसवांच्या ज्योती असा सांगावा धाडत या महाकाय सागरात तुला विसर्जित बघण्याचा काळ म्हणजे आम्हासाठी हळवा क्षण. जुन्याला घेऊन, नवस्वागतासाठी सज्ज होताना मनातली हुरहुर कळेल का तुला? ती अनुभवण्याची गोष्ट आहे. वर्ष अखेरीला नवे संकल्प सोडायचे. जुन्या चुका टाळायच्या. प्रगल्भ होताना अवधान बाळगायचं. तू सोडून जाताना, तुला सोडून जाताना या वाक्यांमधे 'सोडून जाताना' यात दुखाची सल आहे. सूर्योदय ते सूर्यास्त या प्रवासात घटका दोन घटका सुखदुःखाच्या मोजत असतो. त्यातला एकेक दिवस म्हणजे जगण्याचा एक साकव, जो प्रश्नांची उकल करतो उत्तर शोधतो. महिने सरतात. वर्ष बोलतात. ऋतू अवतरतात. अधिक वेगाने डिसेंबर येतो तेव्हा घड्याळाची टिकटिक वाढते. काटे वेग पकडतात. सेकंदामधूनी वेळ निसटते, वेगाने धावते. पानगळतीच्या दिवसात जुने हिशोब नव्याने पटावर येतात. कमी, अधिक, चांगल, वाईटचा ग्राफ नजरेसमोर येतो. भावबंध, लागेबंध सळसळून उठतात. त्यावेळी चपळाईने निसटण्याची तुझी कला मला बैचेन करते. तुझ्या अस्तानिशी उभारी घेऊ शकणार नाहीत अशी नाती, गोती, मैत्रैय अस्त पावलेले असतात. तू उद्याची स्वप्न घेऊन येतोस. पण मनातली जळमट जायला किती काळ जाईल सांगता येत नाही. आपलं काहीही नसतं हे कळायला सुद्धा वय निघून जातं. परके आपले आणि आपले परके होतात. इथं एक वर्ष काय देत, यापेक्षा काय हिरावून नेत हे महत्त्वाचं. वर्षाच्या समाप्तीला नववर्षाची सुरुवात म्हणजे आठवणी ठेवून जाव्यात की घेऊन जाव्यात. नववर्ष स्वागत म्हणजे सुख स्वीकारण्याचा काळ. नव्या ताकदीने अभिव्यक्त होण्याचा काळ. वाहत्या पाण्याकडून शिकण्याचा काळ. सुरकुतल्या चेहऱ्याकडून समजून घेण्याचा काळ. काय घ्यावं, काय न्यावं, काय शिलकीत ठेवावं, काय वाटून द्यावं या पलीकडे अस्ताला टिकटिक करणारी शेंदरी सायंकाळ सरत असते. निसटतो क्षण न् क्षण झरझर सेकंदातूनी. आठवांचे उमाळे पाझरती हृदयातूनी. कप्पा कप्पा साठलेला रिक्त केला. जीवनाकडे बघण्याचे तू मर्म देऊनी गेला. पंचविसाव्या उजेडात सव्वीसाव प्रसवावं. मोकळ्या श्वासासाठी आयुष्य जगावं. तुला सोडून जाताना २०२५ हळवं झालयं. मुक्त केलयं भावनांना. अंतर्मनातला आवाज मात्र ऐकू येतोय. आता सक्षम होत जास्तीत जास्त काम करायचंय. शब्दांचा जिवंतपणा जपून भवताली शब्दसामर्थ्याचे झरे वाहू द्यायचेत. सिद्ध करण्यासाठी मनात खूणगाठ पक्की केलीयं. आठवणीमध्ये अंतरंग तेवत ठेवेन. असेन मी नसेन मी, परी तुला कळेन मी. येणाऱ्या काळात रस्ते, वळणं अवघड असली तरीही, मार्गक्रमण करत रहायचयं उद्याचा सूर्योदय पाहण्यासाठी. कारण निरोप घेऊन तू जातोस, पण थोडासा इथेचं राहतोस.

# नर्मदा खोऱ्याच्या विकासासाठी खासदार गोवाल पाडवींचा बोट प्रवास

## ५०० कोटींच्या पाणी योजनेसह रोजगाराचा नवा 'रोडमॅप' तयार!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार लोकसभा मतदारसंघाचे तरुण आणि तडफदार खासदार ड. गोवाल पाडवी यांनी नुकताच नर्मदा खोऱ्यातील अतिदुर्गम पाड्यांचा झंझावाती दौरा केला. केवळ कार्यालयात बसून न राहता, प्रत्यक्ष नर्मदा पात्रातून नौकाविहार करत त्यांनी बुडीत क्षेत्रातील गावांमध्ये पोहोचून तेथील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. या दौऱ्यातून त्यांनी दुर्गम भागातील पाणी, रोजगार आणि पायाभूत सुविधांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी ५०० कोटींच्या मेगा प्रकल्पाचे संकेत दिले आहेत.

नर्मदा बुडीत भागातील वस्त्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी 'जल जीवन मिशन' अंतर्गत ५०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाचा एक भव्य प्रकल्प प्रस्तावित असल्याची माहिती खासदारांनी दिली. या प्रकल्पासाठी महाराष्ट्राच्या हक्काचे ०.३ टी एम सी पाणी वापरले जाणार आहे. हा प्रकल्प प्रत्यक्षात

> नर्मदा काठच्या माझ्या आदिवासी बांधवांचा संघर्ष मी जवळून पाहिला आहे. इथल्या दुर्गम भागातील ग्रामस्थांची अडचण ही माझी वैयक्तिक जबाबदारी आहे. पाणी, वीज, रस्ते आणि सन्मानासाठी आमचा हा संघर्ष सुरूच राहील. ५०० कोटींचा हा प्रकल्प केवळ आकडा नसून तो इथल्या जनतेच्या भविष्याचा आधार आहे.
>
> – ॲड. गोवाल पाडवी, खासदार (नंदुरबार)



आल्यास गेल्या अनेक दशकांपासून पाण्यासाठी दाहीदिशा भटकणाऱ्या आदिवासी बांधवांचा वनवास संपणार आहे.नुसती चर्चा न करता कामात गतिमानता आणण्यासाठी खासदार पाडवी यांनी सोबत जल जीवन मिशन आणि नाबार्ड च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना नेले होते. भुषा परिसरातील सुरू असलेल्या कामांची पाहणी करून, पुढील कामांसाठी प्रत्यक्ष जागेवरच स्थळ निश्चिती करण्यात आली. विशेष म्हणजे, रस्ते नसलेल्या या भागात खासदारांनी बोटीद्वारे प्रवास करून शेवटच्या टोकाच्या माणसापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला.

**स्थानिक मत्स्यव्यवसायाला मिळणार जागतिक ओळख**

दौऱ्यादरम्यान सावर्यादिगर, भुसा, गेला, माळ, खडी या भागातील मत्स्यव्यवसायाची त्यांनी बारकाईने पाहणी केली. येथील लहान माशांची चव आणि गुणवत्ता देशाच्या विविध भागांत प्रसिद्ध आहे. या नैसर्गिक संपत्तीला हक्काची बाजारपेठ मिळवून देऊन तरुणांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.खासदार गोवाल पाडवी यांनी या दौऱ्याच्या माध्यमातून केवळ समस्या मांडल्या नाहीत, तर त्या सोडवण्यासाठी एक कृतीशील 'रोडमॅप' मांडला आहे त्यात पाणी उपलब्ध करून देऊन स्थलांतर रोखण्यावर भर.वीज आणि रस्ते कामांचा तातडीने पाठपुरावा.नर्मदा पात्रातील निसर्गसौंदर्य लक्षात घेता पर्यटनाचा विकास. खासदारांच्या या संवेदनशील आणि आक्रमक पवित्र्यामुळे नर्मदा खोऱ्यातील जनतेमध्ये आनंदाचे वातावरण असून, विकासाची नवी पहाट होण्याची आशा निर्माण झाली आहे.

# जयसिंह भैय्यांच्या वाढदिवसानिमित्त तेलगावात डॉ.वेताळ यांनी घेतलेल्या महाआरोग्य शिबीरास प्रचंड प्रतिसाद

## १२०० रूग्णांची विक्रमी तपासणी; गोळ्या औषधीही मोफत वाटप

दैनिक वादळ वार्ता

**तेलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे युवानेते जयसिंह भैया सोळंके यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने माऊली हॉस्पिटल व तेलगाव जि.प.गटाचे डॉ. हनुमंत अंकुश वेताळ यांनी मंगळवारी घेतलेल्या महाआरोग्य सर्वरोग आरोग्य तपासणी शिबीरास प्रचंड प्रतिसाद मिळाला असुन, या महाआरोग्य शिबीरात तब्बल १२०० रूग्णांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली. विशेष म्हणजे ज्या रूग्णांना औषध गोळ्या अवश्यक होत्या त्यांना मोफत गोळ्या औषधी वाटप करण्यात आले. याच शिबीरात नेत्र तपासणी ही करण्यात आली.




तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन तथा जि.प. अर्थ व बांधकाम विभागाचे माजी सभापती जयसिंह भैया सोळंके यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने तेलगाव येथील माऊली हॉस्पिटल व तेलगाव जि.प.गटाचे डॉ. हनुमंत अंकुश वेताळ यांनी तेलगाव येथे दि. ३० डिसेंबर रोजी भव्य महाआरोग्य सर्वरोग आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले होते. मंगळवारी सकाळी १० वाजता माऊली हॉस्पिटल माजलगाव रोड तेलगाव येथे एका शानदार समारंभात मान्यवरांच्या उपस्थितीत म हाआरोग्य शिबीराचे उदघाटन करण्यात आले. त्यानंतर प्रत्यक्ष नागरिक, रूग्णांच्या आरोग्य तपासणीस प्रारंभ झाला. या शिबिरात उच्च रक्तदाब, मधुमेह, पोटाचे विकार, मुतखडा, डायरिया, अस्थिरोग, हृदयरोग, रक्तातील गुणवत्ता, फुफ्फुसाचे विकार, गोळ्या औषधीही मोफत वाटप महाआरोग्य शिबीरात तपासणी करण्यात आलेल्या रूग्णांना गोळ्या, औषधी व इतर मेडिकल डॉ. हनुमंत अंकुश वेताळ यांच्या मार्फत मोफत वाटप करण्यात आले. त्यामुळे रूग्णांच्या चेहऱ्यावर आनंद दिसुन येत होता. दमा, टीबी, त्वचारोग, कान नाक, घसा, दंत, नेत्र तपासणी तसेच कर्करोग जनजागृती करण्यात आली. तेलगावात पहिल्यांदाच झाले महाआरोग्य शिबीर युवानेते जयसिंह भैया सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. हनुमंत अंकुश वेताळ मंगळवारी घेतलेले महाआरोग्य सर्वरोग आरोग्य तपासणी शिबीर तज्ञ डॉक्टरांच्या टीम कडून आरोग्य तपासणी

या महाआरोग्य शिबीरात आलेल्या रूग्ण व नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यासाठी तज्ञ डॉक्टरांचे पथक आले होते. डॉ. हनुमंत अंकुश वेताळ यांच्यासह पोट विकार तज्ञ डॉ. गणेश बाबरे, कान, नाक, घसा तज्ञ डॉ. लक्ष्मीकांत यादव, डॉ. किरण जाधव, दंत चिकित्सक डॉ. बालाजी घुले, जनरल फिजिशन डॉ. अनिकेत ढगे तसेच नेत्र तज्ञ आदिंच्या पथकाने तपासणी केली. हे तेलगावच्या इतिहासात पहिल्यांदाच झाले. आणि त्याला मोठा प्रतिसाद मिळुन तब्बल १२०० रूग्णांची तपासणी झाली.

# चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनास भेट

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ३१ डिसेंबर रोजी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनास शैक्षणिक भेट दिली.या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यां मध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे तसेच नवकल्पनांची ओळख करून देणे हा होता.या विज्ञान प्रदर्शनामध्ये विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी तयार केलेली शास्त्रीय मॉडेल्स,प्रयोग व प्रकल्प मांडण्यात आले होते.ऊर्जा संवर्धन, पर्यावरण संरक्षण, जलव्यवस्थापन,आरोग्य व तंत्रज्ञान या विषयांवरील प्रकल्पांनी विद्यार्थ्यांचे विशेष लक्ष वेधून घेतले.चाईल्ड प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी हे सर्व प्रकल्प उत्सुकतेने पाहिले व संबंधित विद्यार्थ्यांशी संवाद साधून माहिती जाणून घेतली.शिक्षकांनी ही विद्यार्थ्यांना प्रत्येक प्रकल्पाचे शास्त्रीय महत्त्व समजावून सांगितले.

या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली असून विज्ञान विषयाबद्दलची गोडी वाढण्यास मदत झाली आहे.या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शिक्षक तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले या बद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले आहे.



# लोहा नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा कै.जिजाबाई व्यंकटराव मुकदम यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । प्रतिनिधी**

लोहा नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा कै. जिजाबाई व्यंकटराव मुकदम (चव्हाण) यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन शुक्रवार, दि. ०२ जानेवारी २०२६ रोजी विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.


या निमित्ताने सकाळी १०.०० वाजता दुग्ध अभिषेकाचा धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, त्यानंतर दुपारी १२.०० ते ३.०० या वेळेत स्नेहभोजनाचा कार्यक्रम होणार आहे. हा संपूर्ण कार्यक्रम व्यंकटेश गार्डन मंगल कार्यालय, लोहा येथे संपन्न होणार आहे.

कै. जिजाबाई मुकदम यांनी आपल्या कार्यकाळात लोहा शहराच्या विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य केले. त्या सामाजिक, राजकीय व सार्वजनिक जीवनात सक्रिय असून सर्वसामान्य नागरिकांशी त्यांचा जवळचा संपर्क होता. त्यांच्या जाण्याने लोहा शहराने एक कर्तव्यदक्ष नेतृत्व गमावले आहे.या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त श्री.



माणिकराव व्यंकटराव मुकदम (चव्हाण), श्री. नारायणराव व्यंकटराव मुकदम (चव्हाण), श्री. केशवराव व्यंकटराव मुकदम (मुकदम), श्री. माधवराव व्यंकटराव मुकदम (चव्हाण) व समस्त मुकदम (चव्हाण) परिवाराच्या वतीने सर्व नातेवाईक, मित्रमंडळी तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# साई संस्थान एम्पलॉइज सोसायटी कर्मचारी सुनील गाढवे यांच्या प्रामाणिकपणा मुळे सोसायटीच्या वतीने सत्कार



दैनिक वादळ वार्ता

**शिर्डी । प्रतिनिधी**

शिर्डी श्री साई संस्थान एम्प्लॉईज सोसायटी कर्मचारी सुनील गाढवे साई आश्रम भक्त निवास (१०००) रूम येथे ड्युटी करीत असताना झेरॉक्स दुकानासमोर अज्ञात साई भक्ताचे दोन हजार रुपये सापडले त्यांनी ते प्रामाणिक पणे साई आश्रम भक्तनिवास १००० रूम सुपरवायझर व संचालक मिलिंद दुनबळे यांच्याकडे जमा केले त्यावेळी धनराज चितळकर सुपरवायझर विक्रम चौधरी उपस्थित होते या प्रामाणिकपणामुळे साई संस्थान एम्पलॉइज सोसायटी चे चेअरमन विठ्ठलराव पवार व व्हाईस चेअरमन पोपटराव कोते व संचालक मंडळ व सचिव विलासराव वाणी व सहसचिव बाबासाहेब अनार्थे व संभाजी कोते संस्थान कर्मचारी व सोसायटी कर्मचारी यांनी त्यांच्या प्रामाणिकपणे मुळे अभिनंदन केले.

यावेळी चेअरमन विठ्ठल तुकाराम पवार पा, व्हा. चेअरमन पोपटराव भास्करराव कोते पा. संचालक महादु बापुसाहेब कांदळकर, कृष्णा नाथा आरणे, भाऊसाहेब चांगदेव कोकाटे पा., संभाजी शिवाजी तुरकणे पा., देविदास विश्वनाथ जगताप, विनोद गोवर्धन कोते पा., मिलींद यशवंत दुनबळे, तुळशिराम रावसाहेब पवार पा., रविंद्र बाबु गायकवाड, भाऊसाहेब लक्ष्मण लवांडे पा., इकबाल फकिरमहंमद तांबोळी, सौ सुनंदा किसन जगताप पा., सौ. लता मधुकर बारसे पा., रंभाजी काशिनाथ गागरे, भाऊसाहेब भानुदास लबडे पा., सचिव विलास गोरखनाथ वाणी पा. सह सचिव बाबासाहेब शंकर अनर्थे पा., सहाय्यक सह सचिव संभाजी सोपान कोते पा. व कर्मचारी वर्ग उपस्थित होते

# राज्यातील २४० सायकलपटूंचा उत्स्फूर्त सहभाग चांदबीबी महाल परिसर गजबजला सायकपटूंनी

दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर | प्रतिनिधी

जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर व सायकलिंग असोसिएशन ऑफ अहिल्यानगर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली राज्यस्तरीय शालेय सायकलिंग रोड रेस क्रीडा स्पर्धा चांदबीबी महाल, वाळुंज बायपास येथे अत्यंत उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. सकाळी कडाक्याच्या थंडीत सायकलपटूंनी आपल्या वेग, सहनशक्ती व फिटनेसचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. वाऱ्याच्या गतीने सायकलपटूंनी या स्पर्धेत सायकल चालवली.

थंडीच्या आल्हाददायक वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेत मुला-मुलींच्या १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील १२ इव्हेंट घेण्यात आले. ५, १० व २० किलोमीटरच्या विविध गटात झालेल्या शर्यतींमुळे संपूर्ण रस्ता सायकलपटूंनी गजबजून गेला होता. महाराष्ट्रातील सहा विभागातून २४० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला.

या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व नगर तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांच्या हस्ते सायकल रेसला झेंडा दाखवून करण्यात आले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे, क्रीडा अधिकारी प्रवीण कोंढावळे, विशाल गर्जे, क्रीडा प्रबोधिनीच्या प्राचार्या दिपाली पाटील, प्रा. साईनाथ थोरात, महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनचे खजिनदार भिकन अंबे, दिपाली शिलडनकर, रावसाहेब बाबर, सायकलिंग असोसिएशनचे सचिव प्रा. संजय साठे, आरती माने, संजय शिंदे, संभाजी मोहिते, स्वप्निल माने, सागर कोळपकर, शैलेश गवळी, प्रायोजक अविनाश सातपुते, एकलव्य पुरस्कार विजेते सचिन सातपुते, उद्योजक ईश्वर बेरड आदी मान्यवरांसह खेळाडू, प्रशिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविकात दिपाली पाटील म्हणाल्या की, सायकलिंग या खेळात महाराष्ट्रातील खेळाडू आघाडीवर आहेत. पुणे येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग इव्हेंटची माहिती देताना त्यांनी सांगितले की, मोठ्या स्पर्धा १२० ते १५० किलोमिटरपर्यंत असतात, तर शालेय स्तरावर ४० किलोमीटरपर्यंत शर्यती घेतल्या जातात. सायकलिंगमध्ये वापरल्या जाणाऱ्या सायकलींची किंमत १० ते १५ लाख रुपयांपर्यंत असून, सायकलपटू ताशी ६० ते ७० किलोमीटर वेगाने धाव घेतात, असेही त्यांनी नमूद केले.



जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले की, खेळाडूंनी आपला फिटनेस कायम चांगला ठेवावा. उत्तम फिटनेस असल्यास खेळाडू कोणत्याही स्पर्धेत उजळून निघतो. कष्टाशिवाय यशाचा पर्याय नसून, नियमित व्यायाम व शिस्तबद्ध जीवनशैलीचा त्यांनी संदेश दिला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना सांगितले की, कोणत्याही खेळात सातत्यपूर्ण सराव सर्वात महत्त्वाचा असतो. पराभव मनाला न लावता, जिंकण्यापर्यंत सराव सुरू ठेवावा. खेळासोबतच अभ्यासाकडेही लक्ष देणे आवश्यक असून, योग्य मार्गदर्शनाखाली घडलेला खेळाडू निश्चितच यशस्वी होतो, असे त्यांनी सांगितले.

जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे म्हणाले की, खेळाडूंनी यश व अपयश पचवायला शिकावे. पराभवाने खचून न जाता प्रयत्न सुरू ठेवल्यास यश निश्चित मिळते. या स्पर्धेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, पालकांनी मुलांना प्रोत्साहन द्यावे. स्पर्धेदरम्यान कोणताही हस्तक्षेप न करता तज्ञ पंच व तांत्रिक समितीवर विश्वास ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले.यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यात विविध खेळांच्या १३ राज्यस्तरीय स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रावसाहेब बाबर यांनी केले. प्रा. संजय साठे यांनी भारताच्या सायकलिंग संघात १८ ते १९ खेळाडू महाराष्ट्रातील असल्याची माहिती दिली. नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेत महाराष्ट्र संघाने जनरल चॅम्पियनशिप पटकावल्याचे त्यांनी नमूद करत सर्वांचे आभार मानले.

सकाळी ८ वाजता सुरू झालेल्या या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच घार्गे यांनी सायकल चालविण्याचा देखील आनंद घेतला. या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंची राष्ट्रीय सायकलिंग रोड रेस स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे:-

१४ वर्षे मुली मास स्टार्ट प्रथम- मुग्धा कर्वे (पुणे), द्वितीय- समीक्षा देवने (लातूर), तृतीय- कार्तिकी भोसले (नाशिक).

१४ वर्षे मुले मास स्टार्ट प्रथम- श्रव वाळके (पुणे), द्वितीय- वेदांत टिळेकर (पुणे), तृतीय- स्वराज हिंगे (मुंबई).

१४ वर्षे मुली टाईम ट्रायल प्रथम- अर्णवी सावंत (कोल्हापूर), द्वितीय- सृष्टी जगताप (पुणे), तृतीय- नयना शेंडगे (कोल्हापूर).

१४ वर्षे मुले टाईम ट्रायल प्रथम- जीवीन मार्लेषा (मुंबई), द्वितीय- धृव बांदल (कोल्हापूर), तृतीय- स्तवन तिवडे (कोल्हापूर).

१७ वर्षे मुली मास स्टार्ट प्रथम- गायत्री तांबवेकर (पुणे), द्वितीय- राजनंदनी सोमवंशी (क्रीडा प्रबोधिनी), तृतीय- अंकिता पुजारी (क्रीडा प्रबोधिनी).

१७ वर्षे मुले मास स्टार्ट प्रथम- शौनिशा आ.व्ही. (पुणे), द्वितीय- रुद्रनिल पाटील (कोल्हापूर), तृतीय- शंभूराजे यादव (लातूर).

१७ वर्षे मुली टाईम ट्रायल प्रथम- मानसी महाजन (पुणे), द्वितीय- श्रावणी कारंडे (कोल्हापूर), तृतीय- ज्ञानेश्वरी माने (पुणे).

१७ वर्षे मुले टाईम ट्रायल प्रथम- दिग्विजय नवले (पुणे), द्वितीय- वेदांत पानसरे (मुंबई), तृतीय- श्रीनिवास जाधव (क्रीडा प्रबोधिनी).

१९ वर्षे मुली टाईम ट्रायल प्रथम- श्रावणी परीट (पुणे), द्वितीय- श्रावणी घोडेस्वार (कोल्हापूर), तृतीय- तनुजा बागुल (नाशिक).

१९ वर्षे मुले टाईम ट्रायल प्रथम- आर्यन मळगे (कोल्हापूर), द्वितीय- प्रणय चीनगुंडे (लातूर), तृतीय- रोहित महाडिक (मुंबई).

१९ वर्षे मुली मास स्टार्ट प्रथम- श्रावणी कासार (क्रीडा प्रबोधिनी), द्वितीय- संध्या शिंदे (क्रीडा प्रबोधिनी), तृतीय- श्रावणी जगताप (लातूर).

१९ वर्षे मुले मास स्टार्ट प्रथम- चैतन्य हांडीक (मुंबई), द्वितीय- नरेंद्र सोमवंशी (लातूर), तृतीय- ओंकार गांधले (पुणे).

# भाजपाने माझा विश्वासघात केला-छाया भानजी



दैनिक वादळ वार्ता
मुंबई | प्रतिनिधी

वर्सोवा येथील स्थानिक भूमिकन्या विधानसभा-१६४ मधील वॉर्ड क्र.५९ मधील माजी नगरसेविका छाया भानजी यांना उमेदवारी न मिळाल्याने सर्व कोळी समाज नाराज असल्याचे त्यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

त्यावेळी छाया भानजी म्हणाल्या की,आम्ही आमच्या कोळी वाड्याचा विकास, कोळी वाड्याचे सीमांकन करणे, मासेमारी उध्वस्त होऊ नये म्हणून पर्षीयन बोटीना विरोध करणे, झोपडपट्टी म्हणून कोळीवाडयाचा विकास नकोय तर सीमांकन करून आमच्या कोळीवाडयाचा विकास व्हायला हवा आहे. असे मुंबईतील वर्सोवा विधानसभा-१६४ मधील वॉर्ड क्र.५९ मधील माजी नगरसेविका छाया भानजी यांनी सांगितले.

यापुढे त्या म्हणाल्या,मला भाजपा पक्षाने उमेदवारी देण्याचा शब्द दिला होता. मात्र तो नाकारून अन्य व्यक्तीस भाजपाने उमेदवारी दिली. हा माझा विश्वासघात आहे. मी आमच्या मुंबईतील कोळी समाजाची प्रतिनिधी असून मला तिकीट नाकारणे म्हणजेच सर्व कोळी समाजाला नाकारणे असे आहे.

. मुंबई मधील कोळीवाडा, कोळी समाजाची मासे मार्केट आणि कोळी भगिनी त्यांचे व्यवसाय धोक्यात आले आहेत. त्यांना न्याय मिळविणे करीता आम्ही निवडणुक लढवीत होतो मात्र आम्हाला तिकीट मिळाले नसल्याने प्रचंड नाराज असल्याचे कोळी समाजाकडून सांगण्यात येत आहे.

# वीर बाल दिवसानिमित्त आडसूळ महाविद्यालयामध्ये मध्ये शौर्य व राष्ट्रप्रेमाचा जागर

दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर | प्रतिनिधी

चास अहिल्यानगर वीरता, त्याग आणि धर्मनिष्ठेचे प्रतीक असलेल्या वीर बाल दिवसानिमित्त आडसूळ पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांसाठी दिनांक. २६ डिसेंबर २०२५ रोजी विविध प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. श्री गुरु गोबिंदसिंह महाराजांचे पुत्र साहिबजादे बाबा जोरावरसिंह व बाबा फतेहसिंह यांच्या अद्वितीय बलिदानाची आठवण यावेळी करून देण्यात आली.

या निमित्ताने आयोजित भाषण स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

स्पर्धेत सोहम पांचाळ, स्वराज म्हस्के, अनुष्का दुधाडे , अलिशा पठाण, आकांक्षा गंगुर्डे, ज्ञानेश्वरी ढगे, अपूर्वा देशपांडे , श्रावणी काळे आणि ओंकार कृष्णा या विद्यार्थ्यांनी साहिबजाद्यांच्या शौर्य, धैर्य, धर्मनिष्ठा व राष्ट्रप्रेमावर प्रभावी भाषणे सादर केली. त्यांच्या विचारांनी उपस्थितांना प्रेरणा दिली.



कार्यक्रमप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी साहिबजाद्यांच्या बलिदानातून तरुण पिढीने प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. वीर बाल दिवस हा केवळ इतिहासाचे स्मरण नसून, विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, देशप्रेम आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची जाणीव निर्माण करणारा दिवस आहे, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

या वेळी पॉलिटेक्निकचे प्राध्यापक जगधणे एम. के. यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, साहिबजाद्यांचे जीवन हे धैर्य, निष्ठा व राष्ट्रसेवेचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांच्या विचारांचा अंगीकार केल्यासच देशाची प्रगती साध्य होईल.

कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेचे अध्यक्ष माननीय.अनिरुद्ध आडसूळ, सचिव डॉ. लीना आडसूळ, डायरेक्टर श्री.कृष्णा आडसूळ, खजिनदार श्री.परमेश्वर आडसूळ, इंजिनिअरिंग कॉलेजचे डायरेक्टर व प्राचार्य डॉ. प्रदीप एम पाटील, अडसूळ कम्प्युटर अँड मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट चे डायरेक्टर व प्राचार्य डॉ. संभाजी पठारे, फार्मसी प्राचार्य डॉ. संदेश वायाळ, डॉ धनंजय लांडगे, पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्राध्यापक रमेश एस गडाख, सर्व विभाग प्रमुख व सर्व शिक्षक वृंद यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाच्या शेवटी वीर बालकांना अभिवादन करून विद्यार्थ्यांनी त्यांच्या आदर्शांचा जीवनात अंगीकार करण्याचा संकल्प केला.

# नाशिकमध्येही महायुतीचे फिस्कटले शिंदे-अजित पवार गट एकत्र महापालिका निवडणूक लढवणार

दैनिक वादळ वार्ता
मुंबई | प्रतिनिधी


नाशिक महानगरपालिका निवडणुकीसाठी जागावाटपाचा तिढा सुटण्याऐवजी अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे. मागील २-३ दिवसांपासून जागावाटपासाठी बैठकांचे सत्र सुरू होते. मात्र जागावाटपाचा तिढा सुटत नव्हता. त्यामुळे अखेर महायुतीत फूट पडली असून, सोमवारी (२९ डिसेंबर) राज्याचे मंत्री आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवाळ यांनी शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) एकत्र निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली आहे.नरहरी झिरवाळ यांनी स्पष्ट केले की, महायुती म्हणून एकत्र लढण्याची आमची इच्छा होती, परंतु भाजपने घेतलेल्या भूमिकेमुळे आता आम्हाला स्वतंत्र विचार करावा लागत आहे. आपल्याला महायुतीत लढायचे ठरवले होते. त्यामुळे आमच्यात जागांचा विषय आलेला नव्हता. परंतु, आता आमची (शिंदे गट आणि राष्ट्रवादी) चर्चा सुरू झाली असून, आज रात्रभरात पूर्ण जागांबाबत विचार करून, सामंजस्याने प्रश्न सोडवू आणि निवडणुकीला सामोरे जाणार आहोत.जागावाटपासंदर्भात प्रश्न विचारला असता, आमच्यात मेरिटनुसार जागावाटप होणार असल्याचे झिरवाळ यांनी सांगितले. ज्याला इलेक्टीव मेरिट असेल, अशांना उमेदवारी देणार आहोत. तसेच आमच्यासोबत वंचितला तसेच आनंद आंबेडकर यांच्या गटाला घेण्यासंदर्भात चर्चा सुरू आहे, असेही झिरवाळ यांनी सांगितले.एकीकडे महायुतीत बिघाडी झाली असताना, महाविकास आघाडीने मात्र कमालीची एकजूट दाखवली आहे. विशेष म्हणजे, नाशिकमध्ये मनसे देखील महाविकास आघाडीच्या सोबतीने निवडणूक लढवणार आहे. मतांचे विभाजन टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पत्रकार परिषदेत दिली. उद्धव ठाकरे यांची शिवसेना या आघाडीत 'मोठ्या भावा'च्या भूमिकेत असेल. शिवसेनेच्या वाट्याला आलेल्या कोट्यातून मनसेला जागा दिल्या जाणार आहेत.अद्याप १० ते १२ जागांवर चर्चा सुरू असून आज रात्रीपर्यंत त्यावर शिक्कामोर्तब होईल. भाजपला रोखण्यासाठी मतांचे विभाजन टाळणे, हाच आमचा मुख्य उद्देश आहे, असे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते सुनील भुसारा यांनी सांगितले.



# अविनाश देशमुख यांनी वनाधिकाऱ्यांना धरले धारेवर;बिबट्याच्या तोंडाला मानवी रक्त लागण्याची वाट पाहत आहात काय?

दैनिक वादळ वार्ता
बदलापूर | प्रतिनिधी

बदलापूर परिसरात अनेक दिवसापासून बिबट्याने धुमाकूळ घातला असून मानवी वस्तीमध्ये बिबट्याची मोठी दहशत पसरली आहे मागील काही दिवसांपासून बदलापूर परिसरातील आंबेशिव,काराव वांगणी बिबट्याचा वावर आढळून आलं आहे. या बिबट्याला पकडण्यात वनविभागाच्या यंत्रणेला अपयश आले आहे. त्यातच बिबट्याने आत्तापर्यंत अनेक प्राण्यांवर हल्ला केला आहे. यामुळे परिसरात बिबट्याची दहशत कायम आहे.मानवी वस्तीमध्ये बिबट्याची दहशत कमी करण्यासाठी शरदचंद्र पवार गटाचे नेते अविनाश देशमुख यांनी बदलापूर वनविभागावर अनोख्या पद्धतीने आंदोलन केले असून बिबट्याचा पिंजरा व प्रतिकृती बिबट्या देऊन वनाधिकाऱ्याला चांगलेच धारेवर धरले आहे .बदलापूर जवळ आलेल्या आंबेशिव गावात बिबट्याचा वावर आढळून आला. त्याच बिबट्याने बकरी व कुत्र्यावर हल्ला केला यानंतर वनविभागाने अनेक ठिकाणी पिंजरे व कॅमेरे बसवले नंतर बिबट्या कुणाच्याही दृष्टीस पडला नाही. यामुळे रेस्क्यू टीम परत गेल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे होते यानंतर काही दिवसांनी वांगणी जवळील काराव गावालगत बिबट्याचे वावर दिसले तोच बिबट्या तिकडे गेल्याचं काही नागरिकाचे म्हणे आहे यामुळे बिबट्याला पकडण्यासाठी बदलापूर वनविभाच्या रेस्क्यू टीमने बिबट्याला पकडण्यासाठी सापळा रचला होता मात्र बिबट्याला पकडण्याच्या वनविभागाच्या प्रयत्नांवर पाणी फेडले गेले.यामुळे बिबट्या पकडला गेला नसल्यामुळे बदलापूर परिसरातील नागरिकाच्या मनात भीतीचे सावट आहे हे लक्षात घेत अविनाश देशमुख यांनी आपला आंदोलन वनविभागाच्या कार्यालयावर धडक दिली वनाधिकाऱ्यांच्या टेबलावरती बिबट्याची प्रतिकृती देवून वनविभागाचा कारभारावर नाराजी व्यक्त केली बदलापूर परिसरातील गावांमध्ये बिबट्याची मोठ्या प्रमाणात दहशत आहे जवळपास एक महिना होत आला असून बिबट्याला पकडण्यास वनविभागाला अपयश आले आहे वनविभाग नक्की काय करतो? नागरिकाच्या मनातील भीती कशी कमी करणार? वनअधिकारी ह्यांना पिंजरा आणि बिबट्याची प्रतिकृती देशमुखाकडून भेट देण्यात आली गेली एक महिन्यांपासून बदलापुर शहरातील आसपासच्या भागात बिबट्याची दहशत निर्माण झाली असून बिबट्या नागरी वस्त्यांमध्ये येऊन पाळीव प्राण्यांची शिकार करत असताना वनअधिकारी बघण्याची भूमिका घेत आहेत वनाधिकारी बिबट्याच्या तोंडाला मानवी रक्त लागण्याची वाट पाहत आहात काय ? ग्रामीण भागातील लोक जीव मुठीत घेऊन बिबट्याच्या भीती मुळे जीवन जगत आहेत रात्रीचे बाहेर पडणे मुश्किल झाले आहे बिबट्या पकडण्यासाठी तुमच्या कडे यंत्रणा नाही उद्या कोणाचा जीव गेला तर ह्याला जबाबदार वनविभागाची असेल चार पाच दिवसात तुमच्या यंत्रणेत बदल करा नाहीतर उंदीर पकडण्याचे पिंजरे तुम्हाला भेट म्हणून देणार असे अविनाश देशमुख यांनी अधिकाऱ्यांना ठणकावले विशेषता बिबट्याच्या दहशतीमुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे दिसत आहे शेतावरती काम करणाऱ्या शेतकऱ्यांनाही मनात भीती बालगुन शेतातली कामे करावी लागत आहे यामुळे वन विभागाने ताबडतोब या बिबट्याचा बंदोबस्त करून जेलबंद करावे यानंतरच नागरिकांच्या मनातील भीती कमी होऊ शकते त्याचबरोबर वन विभागाने नागरिकांच्या मनात जनजागृती करणे गरजेचे आहे असे मत देशमुखांनी व्यक्त केले.



# भक्तीचा महाकुंभ! संत गुलाम महाराज पालखी सोहळ्याचे वाण्या विहीरमध्ये अभूतपूर्व स्वागत; नागेश पाडवींनीही धरली वारीची वाट

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्याच्या पर्वतरांगांमध्ये सध्या भक्तीचा मळा फुलला आहे. खाई (तालुका. अक्कलकुवा) येथून निघालेल्या आणि संत गुलाम महाराज यांचे जन्मस्थान व समाधी स्थळ असलेल्या रंजनपूरकडे जाणाऱ्या संत पालखी सोहळ्याचे वाण्याविहीर येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी हजारो भाविकांच्या उपस्थितीने संपूर्ण परिसर 'गुलाम महाराज की जय'च्या घोषाने दुमदुमून गेला होता.

पालखीचे वाण्याविहीरमध्ये आगमन होताच ठिकठिकाणी रांगोळ्या काढून आणि सुवासिनींनी औक्षण करून स्वागत केले. पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. सातपुड्यातील आदिवासी संस्कृती आणि भक्तीचा अनोखा संगम या सोहळ्यात पाहायला मिळाला. पारंपारिक वाद्यांच्या गजरात आणि भजनांच्या सुरात भक्त तल्लीन झाले होते. या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे भारतीय जनता पक्षाचे नेते नागेश पाडवी यांचा सहभाग. केवळ स्वागत करून न थांबता, नागेश पाडवी यांनी वाण्याविहीर ते रामपूर या दरम्यानचा प्रवास पायी चालत पूर्ण केला. आप की जय परिवाराच्या खांद्याला खांदा लावून, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत पाडवी यांनी या दिंडीत सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांच्या या साधेपणाची आणि भक्तीभावाची परिसरात मोठी चर्चा होत आहे. संत गुलाम महाराज हे आदिवासी समाजाचे श्रद्धास्थान आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी ही दिंडी दरवर्षी काढली जाते. खाई ते रंजनपूर या जन्म आणि समाधी स्थळापर्यंतचा हा प्रवास अत्यंत खडतर असला, तरी भाविकांचा उत्साह दांडगा असतो. या पालखी सोहळ्याचे ठळक वैशिष्ट्ये म्हणजे अबालवृद्धांपासून ते महिलांपर्यंत सर्वांचा मोठा सहभाग. वाण्याविहीर येथील स्थानिक ग्रामस्थांतर्फे वारकऱ्यांसाठी अल्पोपहार आणि पाण्याची चोख व्यवस्था करण्यात आली होती. आदिवासी भागातील भजन मंडळींनी सादर केलेली भजने आकर्षणाचे केंद्र ठरली. या पालखी सोहळ्यामुळे संपूर्ण अक्कलकुवा तालुक्यात सध्या मंगलमय आणि भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून, हा सोहळा आता आपल्या पुढील मुक्कामाकडे रवाना झाला आहे.या सोहळायला नाला गावाचे सरपंच भूपेंद्र पाडवी, अलिविहीरचे सरपंच किसन नाईक यांची देखील उपस्थिती होती.



# पंचशील नगर येथे भीमगीतांचा कडकडाट; भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त संतोष जोंधळे यांचा कार्यक्रम संपन्न

## नवनिर्वाचित नगरसेवक प्रमोद शिंदे यांचा स्तुत्य उपक्रम; भीमप्रेमींची अलोट गर्दी

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाच्या शौर्य गाथेला अभिवादन करण्यासाठी आणि शौर्य दिनाचे औचित्य साधून बीड शहरातील पंचशील नगर येथे भव्य 'भीमगीत' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राचे प्रसिद्ध गायक संतोष जोंधळे यांच्या सुमधुर आवाजाने पंचशील नगर परिसर भीममय झाला होता. नवनिर्वाचित नगरसेवक प्रमोद अण्णा शिंदे आणि रंजीत बनसोडे यांच्या पुढाकाराने राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी उपस्थिती लावून अभिवादन केले. त्यांच्यासोबतच नगरसेवक विनोद मुळूक, नगरसेवक भैय्यासाहेब मोरे आणि आरतीताई बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी भीमा कोरेगावच्या इतिहासाला उजाळा देत उपस्थितांना शौर्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.गायक संतोष जोंधळे यांनी सादर केलेल्या क्रांतीकारी भीमगीतांनी उपस्थितांमध्ये नवा उत्साह भरला. या कार्यक्रमाला केवळ पंचशील नगरच नव्हे, तर बीड शहरातील विविध भागांतून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेषतः महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.नगरसेवक प्रमोद अण्णा शिंदे यांनी लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर अशा सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रंजीत बनसोडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# केज रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी असरार कुरेशी तर सचिवपदी हनुमंत भोसले

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ केज च्या अध्यक्षपदी प्रसिद्ध व्यावसायिक असरार कुरेशी तर सचिव पदी संस्थापक अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांची निवड करण्यात आली आहे.केज येथील रोटरी क्लब ची स्थापना २००५ साली झालेली असून गेली २० वर्षापासून क्लब च्या वतीने केजशहरात विविध सामाजिक,शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात आलेले आहेत.आजपर्यंत सर्वच अध्यक्षांच्या कार्यकाळात शहरात व परिसरात केज रोटरीच्या वतीने उत्कृष्ट कार्य पार पाडले गेले आहे.रोटरी क्लब या आंतरराष्ट्रीय सामाजिक संस्थेत प्रत्येक अध्यक्ष व सचिव यांना ०१जुलै ते ३० जून असा फक्त एक वर्षाचा कार्यकाळ निश्चित केलेला आहे.केज रोटरी च्या २०२५ - २०२६ वर्षा साठी विद्यमान अध्यक्ष सत्यवान राऊत व सचिव प्रवीण देशपांडे हे कार्यरत आहेत.रोटरी क्लब ने २०२६ - २०२७ या



वर्षासाठी अध्यक्ष म्हणून केज येथील प्रसिद्ध उद्योजक असरार कुरेशी यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. आपल्या कार्यकाळात केज शहर व परिसरात केज रोटरीचे जास्तीत जास्त कार्य करण्याचा निर्धार भावी अध्यक्ष असरार कुरेशी यांनी व्यक्त केला आहे.या काळात अनेक समाजोपयोगी कार्य करून केज रोटरी चे नांव उंचावू असे ते म्हणाले.या काळात केज रोटरीचे सचिव म्हणून क्लब चे संस्थापक अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले हे काम पाहणार आहेत.या निवडीबद्दल अध्यक्ष व सचिव यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# धडगाव येथे पशुपालकांसाठी मूल्यसाखळी विकास प्रशिक्षण संपन्न; ७८ पशुपालकांचा सहभाग

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्राम परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत पशुपालकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी धडगाव येथे 'मूल्यसाखळी विकास शाळा व प्रशिक्षण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुर्यदर्शन शेतकरी प्रोड्यूसर कंपनी, कात्री येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात तालुक्यातील ७८ पशुपालकांनी आधुनिक पशुपालनाचे धडे गिरवले.



पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती धडगाव यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाची सुरुवात कुलदेवता आई देवमोगरा मातेच्या पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन) डॉ. तुषार गीते यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवले, तर उद्घाटन तालुका कृषी अधिकारी रमेश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुर्यदर्शन कंपनीचे सीईओ उदेसिंग पाडवी, डॉ. निलेश जोगदंड आणि डॉ. मनोज पावरा यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रशिक्षणात कृषी विज्ञान केंद्र (कोळदा) आणि पशुसंवर्धन विभागातील तज्ज्ञांनी पशुपालकांना सखोल मार्गदर्शन केले. त्यातराजेंद्र दहातोंडे (वरिष्ठ शास्त्रज्ञ): पशुपालनातील नाविन्यपूर्ण प्रयोग.डॉ. किशोर पाटील: पशुआरोग्य आणि व्यवस्थापन.डॉ. राजेश भमसार: आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर.डॉ. राजेंद्र गुजराथी: उत्पन्न वाढीच्या विविध संधी. या एकदिवसीय शिबिरात केवळ पारंपरिक पशुपालन न करता, मूल्यसाखळी बाजारपेठ व्यवस्थापन आणि उद्योजकता विकास यावर भर देण्यात आला. पशुपालकांनी स्वतःचा माल थेट बाजारपेठेत कसा विकावा आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे खर्चात कपात करून नफा कसा वाढवावा, याचे प्रात्यक्षिक ज्ञान देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सविता पिन्नलवार यांनी केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. आशिष वेदपाठक, डॉ. तन्वी कोयंडे, राजपाल पावरा यांच्यासह कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सहभागी पशुपालकांना प्रमाणपत्रे आणि मार्गदर्शनपर पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

प्रशासकीय संदेश:-हा उपक्रम दुर्गम भागातील पशुपालकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त शनिवारी बीडमध्ये भव्य रॅली व अभिवादन सभा

## नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आयोजकांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीमाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड यांच्या वतीने शहरात भव्य अभिवादन रॅलीचे आयोजन शनिवार, दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता करण्यात आलेले आहे.या रॅलीचे उद्घाटन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त मा.प्रदीप भोगले, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त मा.उमेश सोनवणे तसेच समाज कल्याण कार्यालयाचे सहाय्यक संचालक मा.डी.बी. क्षीरसागर यांच्या हस्ते होणार असून नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष मा.प्रा.प्रदीप रोडे, ओबीसी परिषद महाराष्ट्र राज्य चे अध्यक्ष मा.संदीपजी उपरे, सनदी लेखापाल मा.बी.बी.जाधव, राष्ट्रीय कन्या कनिष्ठ महाविद्यालयाचे मा.प्रा.राम गायकवाड,अण्णाभाऊ साठे शिक्षण प्रसारक



मंडळाचे अध्यक्ष मा.उत्तम पवार व यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.गणेश वाघ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रॅलीस सुरुवात होणार असून, माळीवेस चौक, सुभाष रोड मार्गे अण्णाभाऊ साठे चौक, शिवाजी महाराज पुतळा मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे रॅलीचा समारोप होणार आहे.

रॅलीच्या समारोपप्रसंगी सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे भव्य अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या अभिवादन सभेस प्रमुख अतिथी म्हणून मा. श्रीमती प्रियाराणी पाटील, शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग), जिल्हा परिषद बीड, मा.नानाभाऊ हजारे साहेब, शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) बीड व मा.अजय बहीर साहेब, अधिक्षक, शिक्षण माध्यमिक विभाग, जिल्हा परिषद बीड हे उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमात सर्व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, शालेय शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या शिक्षण, स्त्रीमुक्ती व सामाजिक समतेच्या विचारांचा जागर करण्यात येणार आहे. नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्रा.डॉ.अमित बिंदू यांना पीएच.डी.पदवी प्रदान

दैनिक वादळ वार्ता


**माजलगाव | दर्शन डोंगरे**

गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी येथील प्राचार्य आणि गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अमित बिंदू यांनी पीएच.डी. ही सर्वोच्च शैक्षणिक पदवी प्राप्त केल्याबद्दल शिक्षणक्षेत्रात आनंद व अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. डॉ. अमित बिंदू यांना राजस्थान येथील सनराईज या प्रतिष्ठित विद्यापीठातर्फे फार्मास्युटिक्स या विषयात पीएचडी मिळाली आहे. त्यांनी सादर केलेल्या संशोधन प्रबंधाचा विषय फॉर्म्युलशन, डेव्हलपमेंट अँड ईव्होल्युएशन ऑफ स्मुथ अँटीफंगल नॅनोजल हा होता. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी परिवाराच्या वतीने त्यांचे सहर्ष अभिनंदन करण्यात आले आहे.



आदरणीय डॉ. अमित बिंदू यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, संशोधनाची तळमळ, कठोर मेहनत आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली निष्ठा यांच्या जोरावर हे महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. अध्यापनासोबतच संशोधनाकडे असलेला त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन, नवनवीन विषयांचा सखोल अभ्यास आणि शैक्षणिक गुणवत्तेवर असलेला भर यामुळे ते विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक तसेच व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. पीएच.डी. पदवी प्राप्त करणे ही कोणत्याही शिक्षकासाठी केवळ वैयक्तिक उपलब्धी नसून ती संपूर्ण संस्थेसाठी गौरवाची बाब असते. प्रा. डॉ. अमित बिंदू यांची ही यशोगाथा गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीसह संपूर्ण शिक्षणक्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरणारी आहे. डॉ. अमित बिंदू यांच्या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडली असून विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण होण्यास निश्चितच चालना मिळणार आहे असे प्रतिपादन गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष डॉ यशवंत राजेभोसले यांनी कौतुक सोहळ्यात केले. या प्रसंगी गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट परिवाराने प्रा. डॉ. अमित बिंदू यांना हार्दिक अभिनंदन व पुढील शैक्षणिक, संशोधनात्मक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांचे हे यश भविष्यातील अनेक विद्यार्थ्यांना व शिक्षकांना नवी दिशा व प्रेरणा देणारे ठरेल, अशी भावना व्यक्त करण्यात येत आहे.

# विज्ञानामुळे अंधश्रद्धा दुर होते-ॲड.उध्दवराव कराड



दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

गटशिक्षणाधिकारी कार्यालय केज व साने गुरुजी निवासी विद्यालय केज यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय केज तालुका स्तरीय बाल वैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनाचे समापन आज झाले या समापन प्रसंगी उपस्थित बाल वैज्ञानिकां ना मार्गदर्शन करताना बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केजचे अध्यक्ष अँड. उद्धवराव कराड यांनी सांगितले की,प्रयत्नांती परमेश्वर नसुन प्रयत्न हाच परमेश्वर असुन आपण सतत प्रयत्न केल्यास पाहिजे त्याचे संशोधन करून यशस्वी होऊ शकतो शोधाचा उपयोग कशा पद्धतीने करायचा हे कळले पाहिजे गरज ही शोधाची जननी आहे. माणसाच्या जसजशा गरजा वाढत गेल्या तसतसे शोध लागलेले आहेत माणसाला सुखकर होईल असे उपकरण तयार केले पाहिजे या मुळे प्रगतीचे नव नवे टप्पे पार मानवाने पादाक्रांत केले आहे शिक्षणाचा जीवनामध्ये फार महत्त्व आहे विज्ञान प्रदर्शन हे तत्वावर व सिध्दांतवर आधारित आहे.विज्ञाना मुळे अंधश्रद्धा दूर होते विज्ञान प्रदर्शन म्हणजे हिरे शोधण्याचा प्रयत्न आहे यातुनच मोठे शास्त्रज्ञ निर्माण होते असे मार्गदर्शन केले या प्रसंगी व्यासपीठावर गट शिक्षणाधिकारी सर्वश्री सुनिल केंद्रे,साने गुरुजी संकुलाच्या प्राचार्या डॉ. कविता कराड मॅडम,

विशेष शिक्षक वेदपाठक गणेश लक्ष्मणराव,भनगे सर,जोगदंड सर,लोकरे सर,राहुल शिंदे सर, मदने सर,सुनील कांबळे सर, ज्ञानोबा माने,श्रीमती बाराते मॅडम,साधनव्यक्ती श्रीमती रुपनर मॅडम, श्रीमती कदम मॅडम, वाघमारे,नयुम शेख आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती श्रुती लहाने यांनी केले तर आभार प्रदर्शन गुजर एल.जी यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077